# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 05/10/2023 (गुरूवार) सायंकाळ

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

## पोलीस स्टेशन सावनेरची कारवाई

पोस्टे सावनेर :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील सास्वत शाळेजवळ सावनेर येथे दिनांक ०३/१०/२०२३ चे २३.३० वा. ते दिनांक ०४/१०/२०२३ चे ००.४० वा. दरम्यान पोलीस स्टेशन सावनेर येथील स्टाफ यांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, पोलिस ठाणे सावनेर हद्दीतील ०१ किमी अंतरावर सारस्वत शाळेजवळ सावनेर येथे अवैधरीत्या विनापरवाना रेतीची ट्रॅक्टर ट्रॉली व्दारे चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून सारस्वत शाळेजवळ सावनेर येथे पोलीस स्टेशन सावनेर येथील पोलिस स्टाफ यांनी नमुद घटनास्थळी जावून चेक केले असता **आरोपी चालक नामे —१) कैलाश शंकर बनकर, वय ३१ वर्षे, रा. वार्ड क्र. ७ चिचपुरा सावनेर २) शुभम धनराज मौजे, वय २८ वर्षे, रा. वार्ड क्र. १२ ढिवरपुरा सावनेर** यांनी आपले ताब्यातील एक लाल रंगाचा ट्रॅक्टर क्र. एम. एच. ४०/ बी. जे. ९३३० व ट्रॉली क्र. एम. एच—४०/सी ए—०९८१ मध्ये अवैध्यरित्या विनापरवाना २ ब्रास रेती किंमती १०,०००/— रु. ची चोरटी वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीतांच्या ताब्यातून ट्रॅक्टर ट्रॉली किंमती ५,००,०००/—रु असा एकूण वाहनासह ५,१०,०००/—रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे— पोहवा योगेश झोडापे ब. नं. ५५८ पो.स्टे. सावनेर यांच्या रिपोर्टवरून पो. स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द ३७९, ३४ भादवि. सहकलम ४८ (८) म. जमिन महसुल संहिता १९६६ कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ सुभाश राठोड ब. नं. ७४२ पोस्टे सावनेर हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

१) पो.स्टे. भिवापूर :— दिनांक ०२/१०/२०२३ चे १०/३० वा. दरम्यान पो.स्टे. भिवापूर हद्दीत फिर्यादी यांची अल्पवयीन मूलगी वय १७ वर्षे ०२ महीने ही फिर्यादी यांना सांगुन गेली की मी भिवापूर येथे महादिद्यालय येथे जावून येते म्हणुन घरून निघुन गेली तेव्हा पासुन ती घरी आज पर्यंत परत आली नाही. नातेवाईक, आजुबाजुला महाविद्यालय मैत्रीणीकडे आज पावेतो शोध घेतला मिळुन आली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापूर येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक गिरासे पोस्टे भिवापुर मो. नं. ८४१९९४११८८ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. काटोल :–** दिनांक ०४/१०/२०२३ चे १०.०० वा. १५.३० वा. दरम्यान पो.स्टे. काटोल हद्यीत फिर्यादी याने ०९ वर्षा पुर्वी मुलगा दत्तक घेतला होता तेव्हा पासुन तो मुलगा फिर्यादीकडे राहत होता. यातील फिर्यादी व त्यांची पत्नी हे दोघेही कामावर गेले होते. तेव्हा त्यांचा दत्तक मुलगा वय १० वर्ष ५ महिने हा घरी एकटाच हजर असता फिर्यादीचे कायदेशिर रखवालीतुन कोणीतरी अज्ञात इसमाने फूस लसवून पळवून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक आगासे हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**